।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * बुधवार दि.१७ जुलै २०२४ (विशेष अंक) * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक २६ वा


जय जय राम कृष्ण हरि



आषाढी एकादशी

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।। तुळसीचे हार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर तें चि रूप ।।
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ।। तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ।।

# होय होय वारकरी





ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या चार संतश्रेष्ठांनी भागवतधर्म मंदिराची म्हणजेच वारकरी संप्रदायाची रचना केली, तीच मुळी विश्वकल्याणाची सूत्रे केंद्रस्थानी ठेवूनच... एका बाजूला भेदाभेद अमंगळ मानल्याने आलेली सर्वसमावेशकता हे वारकरी संप्रदायाचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे.श्री ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाचा तात्त्विक पाया घातला. नामदेवांनी त्याचा विस्तार केला. एकनाथांनी भागवतधर्म मंदिराला भक्कम आधार दिला आणि तुकाराम महाराज हे भागवतधर्म मंदिराचे कळस ठरले, असे वारकरी संप्रदायाच्या कार्याबद्दल वर्णन संत बहिणाबाईंच्या अभंगात आढळते.ज्ञानेश्वरांच्यावेळी महाराष्ट्रात स्वराज्य होते; पण नंतरच्या अडीचशे वर्षांत मुसलमानी सत्तेच्या दुष्टचक्रात महाराष्ट्र सापडला होता. हिंदूधर्म व संस्कृतीला दैन्यावस्था प्राप्त झाली होती.

एकनाथांच्या काळात या परिस्थितीचा कडवटपणा कमी होऊन धार्मिक पुनरुज्जीवनाला वाव मिळाला. तरीही संत एकनाथांनी बिकट परिस्थितीत वारकरी संप्रदायाच्या पुनरुज्जीवनाचे कार्य उत्साहाने व यशस्वीरीतीने पुढे नेले. वारकरी संप्रदायाने संस्कृती संवर्धनाची कामगिरी केली आहे. ही कामगिरी मोठी गणली पाहिजे. शुद्धाचरणाला महत्त्व असलेल्या या संप्रदायाद्वारे संतमंडळींनी नीतिमत्ता राखली आणि ती वाढीसही लावली. भक्तीच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या या संप्रदायाने बहुजन समाजाला परमेश्वरप्राप्तीचा सुटसुटीत मार्ग दाखवून दिला.वारकरी शब्दाचा अर्थ येरझारा करणारा असा होतो. तो कोणत्याही देवतेची वारी करणाऱ्याला लावता येईल. पण वेदान्त म्हटला, की जसे शंकराचार्यांचे अद्वैत समजले जाते, तसेच नुसता वारकरी पंथ म्हटला तर लोक पंढरपूरचाच वारकरी पंथ असा अर्थ घेतात. याचे प्रमुख कारण असे की, आपल्या पारमार्थिक साधनेत इष्ट देवतेच्या वारीला जितके महत्त्व या पंथाने दिले आहे, तितके इतर उपासना पंथांनी दिलेले नाही. वारकरी होणे याचा अर्थ पंढरपूरला आषाढ शुद्ध एकादशीस व कार्तिक शुद्ध एकादशीस अथवा दोन्हींपैकी एकीस श्री पांडुरंगाच्या दर्शनास जाण्याचा नियम करणे होय.

या पंथाला 'माळकरी पंथ' असेही म्हणतात. बहुतेक धर्मपंथाच्या साधनेत माळेला महत्त्व आहे; परंतु वारकरी पंथ सोडून इतर पंथांत तिचा स्मरणी म्हणून उपयोग केला जातो.वारकरी पंथास 'स्मरणी' म्हणून उपयोगाशिवाय ती गळ्यात घातल्याविना वारकरी होता येत नाही. एकदा माळ घातल्यावर ती घालणाऱ्याच्या बरोबरच जाणार. म्हणजे आयुष्याच्या अखेरपर्यंत! कुटुंबातील एखादी व्यक्ती वारकरी असताना ती गेल्यावर कुटुंबातील दुसरी व्यक्ती वारीव्रत स्वीकारते व घराण्यातील वारी परंपरा अखंडतेने चालू राहते असे बऱ्याचदा पाहावयास मिळते.

संत तुकाराम महाराजांनी भगवद्प्राप्तीकरिता जी साधना केली, तीत पंढरपूरची वारी, भजन यांना मोठे स्थान आहे. पंढरपूरची वारी त्यांच्या घराण्यात कित्येक पिढ्या चालत आली होती. 'माझ्या वडिलांची मिराशी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ।।' या अभंगाप्रमाणेचपंढरीची वारी आहे माझे घरी।आणिक न करी तीर्थव्रत ।।या अभंगातूनही पंढरपूरची वारी आपल्या घरची परंपरा असल्याचे तुकाराम महाराज सांगतात. पंढरपुरचा वारकरी होऊन पंढरपूर पाहावे, असे सांगणाऱ्या संत तुकारामांनी पांडुरंगाबरोबर पंढरीच्या वारीची श्रेष्ठता सांगितली आहे.होय होय वारकरी । पाहे पाहे रे पंढरी ।।काय करावी साधने । फळ अवघेचि तेणे ।।अभिमान नुरे । कोड अवघेचि पुरे ।।तुका म्हणे डोळा । विठो बैसला सावळा ।।पंढरपूर वारी केल्यावर अभिमान गळून पडतो, अभिमान उरत नाही असेही संत तुकारामांनी या अभंगात सांगितले आहे. विठ्ठलभक्तीचा अनुभव अंतकरणपूर्वक घ्यावा, असा विचार संत तुकारामांच्या अभंगात वारी वर्णनात ठायीठायी भरला आहे.'खेळ मांडियेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाई रे, क्रोध अभिमान गेला पावटणी, एकएका लागतील पायी रे'या अभंगात वारीचे दृश्य नजरेसमोर उभे राहते.

गोपीचंदनाचा टिळा लावलेले, गळ्यात तुळशीमाळा घातलेले वारकरी आनंदाने नाचत-बागडत पंढरपूरला निघाले आहेत. टाळ-मृदंगाच्या नादात श्री विठ्ठलाचा नामघोष आसमंतात गर्जत आहे. भक्तीच्या मार्गावरील ही सोपी पायवाट असल्याचे संत तुकाराम महाराजांनी सांगितले आहे. ज्ञान, भक्ती आणि कर्म या तिन्हींचा समन्वय करून सुज्ञापासून अज्ञातापर्यंत सर्वांना सुलभतेने भगवंताची प्राप्ती करून देणारा व ज्याच्या मार्गात योगादी कोणतीही दुर्गमता नाही, असा वैदिक धर्मांतर्गत साधनामार्ग म्हणजेच वारकरी संप्रद्राय किंवा भागवतधर्म होय.वारकरी संप्रदायातील आचार कोणा एका प्रवर्तकाने किवा आचार्याने घालून दिलेला नसून, ते त्यांच्या तात्विक धारणेतून निर्माण झालेल्या नीतीशास्त्रातून स्वाभाविकपणे आकारास आला आहे. परमार्थ मार्गात जी चारित्र्यसंपन्नता आवश्यक असते. तिला ते पोषक ठरले आहेत, स्वाभाविकपणामुळेच. त्यांना कर्मकांडाचे स्वरूप प्राप्त झालेले नाही. विशिष्ट संप्रदायाला पूज्य देवतेच्या स्वरुपातून किंवा देवतेविषयीच्या कल्पनांतून त्या संप्रदायाचा बराचसा आचारधर्म उदयास येताना दिसतो.वारकऱ्यांची देवता विठ्ठल किंवा पांडुरंग. विठ्ठल हे विष्णूचे एक रूप मानले जाते. उपास्यदेवता विष्णू असल्यामुळेआम्ही विष्णुदास वैष्णवांचा धर्म।भेदाभेद भ्रम अमंगळ।।असा समत्वदृष्टिवर आधारित वारकरी पंथ वैष्णवधर्मच नजरेसमोर येतो.

या संप्रदायास पूज्य असलेली देवता समत्वाची, समन्वयाची प्रतीक आहे. विठ्ठलमूर्ती हरिहरैक्याचे प्रतीक असल्याने शैव-वैष्णव समन्वयाचे चित्र महाराष्ट्रात पहावयास मिळते. शैव-वैष्णवांचे इथे इतर प्रांतासारखे झगडे नाहीत. ज्ञानदेव-नामदेवांपासून चोखामेळ्यापर्यंत सर्वांची अंतःकरणे प्रीतीच्या प्रकाशाने उजळलेली आहेत. विश्वबंधुता, समता आणि प्रीती या तीन तत्वांतून वारकऱ्यांचे भावजीवन समृद्ध होण्यास विठ्ठलाची मूर्ती प्रेरणादायी ठरली आहे.'राम कृष्ण हरी' हा या संप्रदायाचा मंत्रराज! या मंत्राचा महिमा तारकमंत्र म्हणून आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ यांनी रामकृष्णहरी मंत्राचा महिमा अभंगातून वर्णन केला आहे. तुळशीमाळ ही विठ्ठलास प्रिय म्हणून सर्व वारकरी गळ्यात धारण करतात. या पद्धतीवरून या संप्रदायास माळकरी म्हणतात. ही माळ घातल्यावर सत्य बोलणे, पर स्त्रीला रुक्मिणी मातेसमान मानणे, हिंसा न करणे, आषाढी वा कार्तिकी एकादशीस पंढरीची वारी करणे, एकादशी व्रत स्वीकारणे, रोज १०८ वेळा 'राम कृष्ण हरी' मंत्र जपणे या नियमांचे पाठन करावे लागते.गोपीचंदनाच्या गंधाची मुद्रा धारण करणे किंवा कपाळाला बुक्का लावणे ही या संप्रदायाची खूण समजली जाते. उराउरी भेटणे हे वारकरी संप्रदायातील वैशिष्ट्य समत्व भावनेचे प्रतीक आहे. वारकरी संप्रदायात भजन, नामस्मरण याप्रमाणे सत्संगासाठी महत्त्व दिले असून, संतांचा संग तो सत्संग असे मानले जाते. या सत्संगाचा पुरस्कार वारकरी संप्रदायाने केला असून, आहार विहारात मांसभक्षण, मदिरापान वर्ज्य मानले आहे. सत्य, अहिंसा, सेवा, त्याग, दया, क्षमा, शांती व नैतिकता यावर आधारित वारकरी संप्रदाय ज्ञानोत्तर भक्तीचा सोपा मार्ग असून सर्वांना सामावून घेणारा आहे. पंढरपूर वारी, एकादशी व्रत व विठोबाचे व्रत या तिन्ही गोष्टी केल्या असता, इतर कसल्याही कर्मकांडाची आवश्यकता नाही असे संत तुकाराम महाराज सांगतात.हीच व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास।।पंढरीचा वारकरी। वारी चुको ने दी हरि।।'विठ्ठल आमुचे जीवन। आगम निगमाचे स्थान'या अभंगात आणि नाम घेता उठाउठी। होय संसाराची तुटी। या अभंगातही विठ्ठल, नामःस्मरण स्पष्ट केले आहे. वैदिकांना प्रमाणभूत असलेले वेद, उपनिषदे, भगवद्गींता, भागवत, ब्रम्हसूत्रे इत्यादी संस्कृत ग्रंथांविषयी वारकऱ्यांच्या मनात पूज्यभाव आहेच. परंतु ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामांची गाथा या तीन ग्रंथांना या पंथात प्रस्थान त्रयीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. या व्यतिरिक्त अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, नामदेवांची गाथा, निवृत्ती, ज्ञानदेवापासून निळोबारायापर्यंतच्या संतांच्या अभंगरचना इत्यादी वाङमय वारकऱ्यांना पूज्यस्थानी आहे. संप्रदायातील थोर व्यक्तिच्या वास्तव्यामुळे अथवा जन्मामुळे त्या त्या ठिकाणांना तीर्थक्षेत्राचे माहात्म्य प्राप्त होत असते. पुंडलिकाच्या वास्तव्यामुळे व पुंडलिकाने पांडुरंगास पंढरपूरला आणल्यामुळे पंढरपूर हे वारकऱ्यांचे प्रमुख तीर्थक्षेत्र झाले आहे.सुख पंढरीसी आले। पुंडलिके साठविले।।असे तुकारामांनी वारकऱ्यांच्या या आद्यक्षेत्राचे वर्णन केले आहे. वारकरी पंथ भेदाभेद मानीत नाही. मानवता धर्माची शिकवण देणारा पंथ म्हणून वारकरी संप्रदायाचा निर्देश करता येईल. विश्वकल्याणाची भूमिका वारकरी संप्रदायाला पायाभूत असल्यामुळे हा संप्रदाय समाजमनावर प्रभाव गाजवू शकला हे स्पष्टच आहे. आणि म्हणूनच वारकरी संप्रदायासाठी आचारधर्म सांगतांना देखील ही विश्वकल्याणाची भूमिका त्यांच्या मनात राहील, हे पाहण्याची दक्षता घेतो. येथेच वारकरी संप्रदाय इतर धर्मसंप्रदायांपेक्षा आगळावेगळा आणि लक्षणीय ठरतो.

**–लेखक:डॉ. अरविंद नेरकर**

********

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४१ वे अंक-३३ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# वारकरी संप्रदाय



दरवर्षी आळंदीहून पंढरपूरला विठ्ठ्याच्या नावाचा गजर करीत केलेली पदयात्रा अर्थातच पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रचं सांस्कृतिक संचितच. यंदाच्या वारीनिमित्ताने या संचिताला उजाळा.

‘वारी’ हा शब्द कानी पडताच आठवण येते ती पंढरपूरला होणाऱ्या आषाढीवारीच्या सोहळ्याची. महाराष्ट्रतून आळंदी, देहू, त्र्यंबकेश्वर, सासवड, एदलाबाद, पैठण, शेगाव इ. प्रसिद्ध संतांच्या गावांहून त्यांच्या पालख्या आषाढी एकादशीस पंढरपूरला जाण्यास हजारो भक्तांसह प्रस्थान ठेवतात. सर्वजण श्रीविठ्ठलाचे दर्शनासाठी भूवैकुंठ पंढरपूरला निघतात ते हरिनाम घोष करत. ऊन, वारा, वादळ, पाऊस कशाचीही पर्वा न करता. तसेच कार्तिकि एकादशीसही आळंदी व पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणावर भक्तांची रीघ लागते. दिंड्या, पताका, टाळ नि मृदुंग यांनी हा सोहळा लक्षवेधी, भक्तिरसानंदाचा होतो.

‘वारी’ या शब्दाचा अर्थ येरझारा हा असला तरी भक्ति संप्रदायात त्यास एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. तो म्हणजे आपल्या आराध्य दैवताचे दर्शनास विशिष्ट महिन्यात विशिष्ट दिवशी नित्यनियमाने जाणे. ज्ञानेश्वरीत ‘वारी’ हा शब्द येरझारा याअर्थी आलेला आहे. विशिष्ट दैवताचे भक्तगण जेव्हा एकत्र येऊन प्रस्थान ठेवतात त्यास दिंडी म्हणतात. या दिंड्या अनेक ठिकाणांहून निघतात व त्या आराध्यदैवताच्या परमभक्ताच्या ठिकाणी- गावी एकत्र येऊन त्या परमभक्ताच्या पालखींबरोबर आराध्य दैवताच्या ठिकाणी जातात. या भारतवर्षांत अशा पद्धतीने अनेक देवदेवतांच्या वाऱ्या करणारे आहेत. बद्रिकेदार, वैष्णोदेवी, अमरनाथ, गाणगापूर, अक्कलकोट, काशीविश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, उज्जन, रामेश्वर, तिरुपती, शबरीमलेया, शेगाव, शिर्डी इत्यादी. मुसलमानही नित्यनेमाने हज यात्रा करतात. तीही वारीच. प्रत्येक धर्माचे पवित्रतम् ठिकाणी त्या त्या धर्माचे लोक विशिष्ट पुण्यप्रद दिवशी नित्यनियमाने येरझार करीत असतातच. जगन्नाथपुरी, द्वारका, सोरटी सोमनाथ, गया, अजमेर, पावापुरी, चंपापुरी इ. इ. असंख्य पवित्र स्थाने आहेत व त्या ठिकाणी नित्यनियमाने जाणारे भक्त आहेत.

वारी करणारा तो वारकरी अशी वारकऱ्याची व्याख्या करता येईल, म्हणजे सर्व धर्मात वारकरी आहेतच. प्रत्येक धर्माचे, संप्रदायाचे वारकरी असतातच व त्यांच्या दैवतांच्या उत्सव/ उरूस/ पुण्यतिथी/ जयंती साठी ते कधी वेगळे कधी जथ्याने तर कधी दिंड्यायुक्त पालखी सोहळ्यारूपाने वारी करतात.

या लेखात भारतातील हिंदू धर्मातील वारकरी संप्रदायाचा त्यातही भागवत संप्रदायाचा परामर्श घेण्याचा अल्प प्रयत्न आहे. महाराष्ट्रत वेगवेगळे धर्म, संप्रदाय आहेत त्यांचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, उपासनाप्रणालीमुळे विभिन्न असले तरी जनसामान्यांचे प्रबोधन व परमार्थ हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे ते शतकानुशतके अनेक परकीय आक्रमणातही धर्म व संस्कृती टिकवून अस्तित्वात राहिले. याचे श्रेय त्या संप्रदायातील संत-आचार्य यांना आहे. विशेषत: हिंदू धर्म व संस्कृती यांची परंपरा या अग्निदिव्यातून तावूनसुलाखून पार पडली व कसास उतरली ती या संत, आचार्य, महात्मे यांच्याच अथक प्रयत्न, परमनिष्ठा, परमश्रद्धा, परमसहिष्णुता, परमशुद्ध पवित्र आचरणानेच.

भारतात हिंदू धर्म संप्रदायाचा विचार करता १) शैव २) वैष्णव व ३) शाक्त ही तीन संप्रदाय रूपे असून, शैव पंथीय प्रभाव दक्षिण भारतात, वैष्णव- उत्तर व पश्चिम भारतात तर शाक्त पूर्व भागात आसाम, बंगाल ओरिसा येथे आहे. तरीही या सर्व संप्रदायांची विभागणी केवळ दोनच भागात होते ती म्हणजे सगुण व निर्गुण. प्रामुख्याने वैष्णव संप्रदाय सगुण आहे. तरीही काही या दोन्हींचा समन्वय करणारे आहेत. दत्त, गाणपत्य, नाथ, राम, कृष्ण, वेदान्ती इ. अनेक संप्रदाय उदय पावले व अस्तित्वात आहेत. वैष्णव/ भागवत संप्रदाय हा प्रमुख गणला जातो. त्यातही उपसंप्रदाय महानुभाव, राधावल्लभ इ. आहेतच. यात निर्गुण भक्ति आचरण करणारा संप्रदाय वेदान्ती वैष्णव व उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, गीता ही आत्मज्ञानी श्रेष्ठ साधने हे त्यांचे तत्त्व तर सगुण संप्रदाय यात भक्तिमार्ग हा सगुण साकार ईशतत्त्व मानणारा आहे. नवविधाभक्तिस यात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

शैव व शाक्त संप्रदायाचा प्रभाव वाढल्याने वैष्णव धर्मास लागलेली घसरण व्यासरचित भागवत पुराणाने नुसतीच थांबली नाही तर त्याद्वारे गीतातत्त्वज्ञानास पुष्टी मिळून वैष्णव संप्रदायाचा पाया भक्कम केला. यंत्र, मंत्र, तंत्र या तीन साधनांत देहकष्ट व बाह्य उपासनेची उणीव/ अभाव यामुळे भक्तिसाधना व गुणोपासना जी वैष्णव संप्रदायाची मुख्य तत्त्वे ती बहुजन समाजास भावली व त्याचे रूपांतर भागवत धर्म भागवत संप्रदायात झाले.

बौद्ध व जैन या धर्मांचा उदय व प्रसार यामुळे भागवत धर्मास लागलेली उतरती कळा वा ओहोटी रामानुजाचार्य, मध्वाचार्य यामुळे थांबली. त्यांनी या दोन धर्मातील साधु, सम्राट, आचार्य व विद्वानांना वादात जिंकून भागवत धर्मध्वजा उंचावली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत व अन्य धर्मआक्रमणांतूनही भागवत धर्म/ संप्रदाय भरभक्कम उभा राहिला याचे कारण त्यास असणारी पूर्वपरंपरा/ पूर्वपीठिका. अन्य धर्म वा संप्रदाय उदयास येण्या आधीच हजारो वर्षे हा भागवत/ वासुदेव संप्रदाय निर्माण झाला होता व अनेक तपस्वी, मुनी ऋषी आचार्य व राजे/सम्राट यांनी त्यास भक्कम आधार देऊन तो अक्षय ठेवला.

यास थोडीशी अवकळा अकराव्या शतकात लागली होती, पण ती फार लक्षणीय नव्हती. ‘यदा यदा ही धर्मस्य.. संभवामी युगे युगे।।’ या भगवद्गीतेतील वचनाप्रमाणे भगवंताने अशा परिस्थितीचा उद्भव झाल्यावर अंशावतार वा स्वत: पूर्णावतार घेऊन धर्मरक्षण वा धर्मध्वजा उन्नत केली आहे. तसे करण्याचे त्यांचे हे वचन त्रिकालाबाधित आहे. त्यामुळे त्यांनी या वेळीही हे कार्य केले. असं म्हणतात कि भक्तश्रेष्ठ पुंडलिकाचे घरी भगवान श्रीकृष्ण स्वत: विठ्ठलरूपात पंढरपुरात त्यांचे घरी प्रगटले व तो माता-पित्याच्या सेवेत मग्न असल्याने त्याने दिलेल्या विटेवर उभे राहिले युगानयुगे. असे सांगतात कि भगवान विठ्ठल कायम येथेच राहावेत म्हणून भक्त पुंडलिकाने स्नान करून येईतो थांबा असे सांगून नदीत आत्मसमर्पण केले व तो परत आलाच नाही. परिणामी विठ्ठल भगवान युगान्युगे त्या विटेवरच उभे आहेत. या आख्यायिकेच्या सत्यासत्यतेत न जाता एवढे मानता येईल कि श्रीविठ्ठल भक्तावर प्रसन्न होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणे पंढरपुरात अक्षय वास करून आहेत. यासंबंधी काही शिलालेख व ताम्रपट आहेत.

भक्त पुंडलिक हाच वारकरी संप्रदाय प्रवर्तक आहे. वारकरी संप्रदायही तसेच मानतो. असे मानतात कि त्या वेळचे होयसळ यादव घराण्यातील विष्णुवर्धन राजास भगवान विष्णू प्रगट झाल्याचे वृत्त कळताच त्याने पंढरपूर (त्या वेळचे) पांडुरंगपूर येथे विठ्ठल मंदिर उभारले व हे विठ्ठलरूप वैष्णवांना अत्यंत प्रिय झाले. भक्त पुंडलिकाने आषाढी शुद्ध एकादशी ही तिथी निश्चित केली त्यामुळे आषाढी एकादशी हा दिवस या संप्रदायात अत्यंत पवित्र मानला जातो. हा त्यांचा व्रत दिवस होय.

श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे पूर्वीही अनेकजण विठ्ठल भक्त होते. पांडुरंग मंदिरात पूजाअर्चाही होत असे. एकादशी व्रत प्रचलित होते. अनेक गावांहून भक्त पंढरपुरास नित्यनेमाने येत म्हणजेच वारी करीत यावरून वारकरी संप्रदायाचा मूळ प्रवर्तक ‘पुंडलिक’च होता हे सिद्ध होते.

जे आषाढी व कार्तिक शुद्ध एकादशीस पंढरपूर व वद्य एकादशीस आळंदीस नियमितपणे जातात त्यांना ‘वारकरी’ म्हणतात. पुष्कळ वारकरी प्रत्येक महिन्याचे शुद्ध ११ ला पंढरपूर व वद्य ११ ला आळंदीस जातात. त्यामुळे या संप्रदायास ‘वारकरी संप्रदाय’ संबोधिले जाते. हे वारकरी गळ्यात नेहमी तुळशीची माळ घालतात. त्यामुळे त्या संप्रदायास ‘माळकरी संप्रदाय’ असेही म्हणतात. भगवंतास सर्वस्व अर्पण करणारा तो भक्त अशी भक्ति याच पंथात सांगितली आहे म्हणून त्यास ‘भागवत संप्रदाय’ असेही संबोधन आहे.

वारकरी संप्रदाय ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकारामाची गाथा हे प्रमुख ग्रंथ मानतो. त्यात ज्ञानेश्वरी सर्वश्रेष्ठ कारण याच ग्रंथातील वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान अन्य दोन ग्रंथांत म्हणजे एकनाथी भागवत व तुकाराम गाथा यात विस्ताराने आहे. या संप्रदायाचे संपूर्ण तत्त्वज्ञान श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या ‘अमृतानुभव’ व ‘हरिपाठ’ तसेच ‘चांगदेव पासष्टी’ यात आहे. या वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सार संक्षेपाने ज्या प्रमुख पाच भागांत विभागले गेले आहे ते पाच भाग- १) परमात्मा परब्रह्म २) विश्व/ जगत ३) जीव ४) माया व ५) मुक्ति/ मोक्ष.

ज्ञानेश्वरीत ‘ओम नमोजी आद्या’ ही प्रारंभ ओवी, तसेच त्यांचे ‘अमृतानुभव’मधील ‘ऐशी इये निरुपाधिके। जगाची जिये जनके। ती वंदिली प्रिया मुळिके। देवोदेवी।। ही ओवी व ‘तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। एक गोविंदु रे। हा अभंग इ.तून परब्रह्मतत्त्व सांगितले आहे.

२) जगत/विश्व- या संबंधी ते परमेश्वराची लीला व स्फूर्ती आहे असे समजतात. अमृतानुभवातील ७-२९१ मधील ओवी ‘यालागी वस्तुप्रभा। वस्तुची पावे शोभा। जात असे लाभ। वस्तुचिया।।’ हेच सांगते. श्रीज्ञानेश्वर माऊली हे स्पष्ट करते कि परमात्मा जगद्रूपाने स्वत:शीच खेळत असतो म्हणून जगत् हे मायारूप नाही तर चिद्विलासरूप आहे आणि हाच माऊलीचा आवडता सिद्धांत आहे. नामरूपात्मक जगत्मिषाने एक ब्रह्मवस्तूच प्रकाशली आहे. तत्त्वत: जगत् काही नसून स्वयंप्रकाशाने ब्रह्मवस्तूच शोभायमान झाली आहे.

३) जीव- तिसरा घटक जीव जो परमात्म्याचा अंश आहे, पण कर्मामुळेच त्याला जीवदशा प्राप्त झाली आहे.

४) माया चौथा घटक जिच्यामुळे जीव बद्ध होतो. ही दोन प्रकारची म्हणजे विद्यामाया व अविद्यामाया असून अविद्यामाया परमार्थप्राप्तीस बाधक आहे तर विद्यामाया परमार्थप्राप्तीस साधक/साहाय्यक आहे. ही माया नदी केवळ महाभयंकर असून अनन्यभावे सर्वसमर्पण करून भगवंत/ परब्रह्मास शरण जाणाराच ती पार करू शकतो. ज्ञानेश्वरीतील सातवा अध्याय यावरच आहे.

५) मोक्ष- हा पाचवा घटक. मोक्ष हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. जिवा-शिवाचे ऐक्य साधणे परब्रह्मात एकरूप होणे म्हणजेच मोक्ष. वारकरी संप्रदायात नवविधाभक्तिप्रकारात नामस्मरण/नामसंकीर्तन हे मोक्षप्राप्तीचे अमोघ साधन मानले जाते व त्यासाठी सत्संगतीलाही फार महत्त्व आहे. स्वत: श्रीविठ्ठलांनीच ‘विठ्ठल हृदय स्तोत्रात स्पष्टपणे सांगितले आहे कि, ‘ कारोऽ नाहतो मूर्तिराहतो नामसंकीर्तनम्।।.’ हरिपाठातसुद्धा हेच नाममहात्म्य वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील अध्याय- ९, ओवी- २०८ हेच सांगते.

अ) उपास्य दैवत - श्रीविठ्ठल- १- वारकऱ्यांच्या संप्रदायाचे व्यापक तत्त्वज्ञानाचे हे आराध्य दैवत. विष्णू, कृष्ण, राम, विठ्ठल यांचा निर्विवाद ऐक्यसंबंध संप्रदायात लोकमान्य आहे. भगवान श्रीविष्णूचे २४ अवतार व दशावतार आहेत. त्यात विठ्ठलाचा उल्लेख नाही. हा शुद्धसत्त्व विठ्ठल विष्णुसहस्रनामाहून वेगळा आहे. तो भक्तसखाही आहे तसाच तो दिनाचा दयाळू, भक्तवत्सल, दयार्णव, कृपाळू, भक्तकामकल्पद्रुम आहे. स्वत: निवृत्तीनाथांनीच सांगितले आहे कि नंदाघरी नांदणारा कृष्णच विठ्ठलरूपात आला व वीटेवर उभा राहिला भक्तांसाठी तो तसाच सतत युगानयुगे उभाच आहे. श्रीकृष्ण जन्म श्रावण वद्य अष्टमीस रोहिणी नक्षत्रावर मध्यरात्री बुधवारी झाला म्हणून विठ्ठलभक्त, हे बुधवार हा विठ्ठलाचा वार मानतात व कधीही बुधवारी पंढरपुरातून परतत नाहीत. विष्णूशी संबंधीत एकादशी व्रत ते निष्ठेने करतात व विष्णुप्रिय तुळस त्यांना अत्यंत प्रिय असते. पंढरपुरातील मंदिरातील शिलालेखात पंढरपूरचा पांडुरंगपूर व विठ्ठलाचा विठ्ठलदेव असा उल्लेख आहे. येथील विष्णुपदाला ‘वेणुनाद’ असे दुसरे नाव आहे. या ठिकाणीच श्रीकृष्ण व संगमदैत्याचे युद्धात संगमदैत्य शिळेखाली दडून बसला त्या शिळेवर पाय ठेवून श्रीकृष्णाने वेणू वाजवायला सुरुवात केली. त्या श्रीकृष्ण भगवानांचा पाय म्हणजेच ‘विष्णुपद’ होय.

विठ्ठलमूर्तीचे रूप मनोहारी आहे. डोक्यावर उंच टोपीसारखा मुकुट यालाच शिविलग म्हणतात. कानात माशाचे आकाराची मकराकार कुंडले, उभट मुख, फुगीर गाल, गळ्यात कौस्तुभमणीहार, उजव्या छातीवर खळगी व वर्तुळखंड असून त्याला श्रीवत्सलांछन व श्रीनिकेतन अशी नावे आहेत. दंडावर व मनगटावर दुहेरी बाजुबंद व मणीबंद कमरेवर हात ठेवलेले व त्याच अवस्थेत उजव्या हातात कमळदेठ कमरेला तीन पदरी मेखला, कमरेला वस्त्र व त्याचा सोगा पावलापर्यंत लांब आहे.

२) विठ्ठल मंदिरे- पंढरपूर, सोलापूर, अहमदनगर, इ. इ. अनेक ठिकाणी महाराष्ट्रात तसेच आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू इ. प्रांतांतही आहेत.

३) विठ्ठलावरील ग्रंथसंपदा- अनेक दुर्मीळ ग्रंथ आता उपलब्ध नाहीत. विठ्ठलगीता, विठ्ठलगीतासारस्तोत्र, विठ्ठल पंचरत्न, श्रीविठ्ठलस्तवराज, श्रीमद्विठ्ठलहृदयस्तोत्र, विठ्ठलाष्टक, श्रीविठ्ठलस्तोत्रम्, पांडुरंगाष्टकम्, विठ्ठलअष्टोत्तरशतनामस्तोत्रम्, विठ्ठलभूषण, विठ्ठलसहस्रनाम, श्रीविठ्ठलऋङमंत्रसारभाष्य इ. इ. श्रीस्कंद, पद्मपुराण व विष्णुपुराणात ‘‘पांडुरंगमाहात्म्य’’ पोथीचा उल्लेख आहे.

४) मंत्र - ‘‘रामकृष्ण हरि’’ हा प्रामुख्याने म्हणतात. इतर विठ्ठल मंत्र असे :- ‘‘विठ्ठलाय नम:’’, ‘‘ विठ्ठलाय नम:’’ ‘‘श्रीकृष्णाय नम:’’ हे तीन विठ्ठल मंत्र म्हणताना / जपानुष्ठान करताना ‘‘ अस्य श्रीपांडुरंगमंत्रस्य पुंडरिक ऋषि: श्रीविठ्ठलो देवता, श्रीविठ्ठल प्रीत्यर्थे चतुर्विधपुरुषार्थसिद्धयर्थे जपे विनियोग:।।’’ असा संकल्पप्रथम म्हणतात.

५) सांप्रदायिक वेशभूषा - गळ्यात तुळशीमाळ, गोपिचंदनादि मुद्रा, हातात भगवी पताका, उभे गंध कपाळी, हाती टाळ/ वीणा/मृदुंग. ‘‘कुंचे पताका झळकती। टाळ मृदुंग वाजती ।। आनंदे प्रेमे गर्जती। भद्रजाती विठ्ठलाचे।।’’ असा संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग आहे. तसेच संत तुकारामही ‘‘गोपीचंदन उटी, तुळशीच्या माळा। हार मिरवती गळा रे। टाळमृदुंग घाई पुष्पांचा वरूषाव। अनुपम्य सुख सोहळा रे।।’’ असे वर्णन करतात.

६) मुख्य कार्यक्रम - पंढरपुरात वारकऱ्यांचे दोन महत्त्वाचे कार्यक्रम असतात. १) चंद्रभागेत स्नान व २) विठ्ठल दर्शन.

७) नीतिनियम - सत्य वदणे, परस्त्रीस मातेसमान मानणे, नियमित वारी-पंढरी व आळंदीस भिक्षापात्र न अवलंबिणे, अन्नदान-गोरगरिबांना, गरजूंना शक्य ती सर्व मदत- आर्थिक वा अन्यप्रकारची निरपेक्षपणे कुवतीनुसार करणे, नामस्मरण नित्य हरिपाठ (हरिपाठ ही वारकऱ्यांची संध्याच असे समजतात), तसेच नामसंकीर्तन, ज्ञानेश्वरी पारायण वा नित्यवाचन इ.इ. याशिवाय प्रत्येक दिंडीचे वेगवेगळे आचारसंहितेचे नियम असतात व ज्या दिंडीत सहभाग असतो त्या दिंडीचे आचारसंहितेचे पालन करणे हेही त्यात येतेच.

वारकरी संप्रदायास देदीप्यमान स्वरूप प्राप्त झाले ते ज्ञानेश्वर माऊलींमुळे. तुकाराम, नामदेव, एकनाथ यांचे काळात वारकरी संप्रदायाचा विकास चरमसीमेस पोहोचला व त्या संप्रदायाचे धार्मिक व सामाजिक कार्य आजही जोमात सुरू आहे. हरिपाठ, ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी, अमृतानुभव, तुकाराम गाथा, नामदेवाचे अभंग, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, भारूडे इ. इ. संतसाहित्यास या संप्रदायात अत्यंत श्रेष्ठ व आवराचे स्थान आहे, तसेच सोपानदेव, मुक्ताई, निवृत्तिनाथ यांचे साहित्यासही आहे.

वारकरी संप्रदायासंबंधी जिज्ञासूंनी ‘‘वारकरी संप्रदाय-उदय व विकास’’ हा भ.प. बहिरट यांचा ग्रंथ वाचावा अधिक विस्तृत माहितीसाठी.अर्वाचीन काळातही या संप्रदायाची उज्ज्वल वाटचाल सुरू आहे. ती धुरा पावसचे स्वरूपानंद, गुलाबराव महाराज, विष्णुबुवा जोग, देगलूरकर, धुंडामहाराज, साखरे, सोनोपंत दांडेकर, केशवराव देशमुख इ. इ. अनेक दिग्गजांनी वाहिली. या संप्रदायातही काही वादविवाद उत्पन्न झाले, पण ते टिकले नाहीत.

-लेखक: आचार्य वसंत गोडबोले

॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥

# पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

स्वच्छ भारत अभियान | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा ३.०

# आषाढी यात्रा २०२४

## यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन

पंढरपूर हे भूवैकुंठ नगरी आहे. या भूवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरिता खालील सूचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

१) यात्रेकरु, दिंडीकरी, फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.

२) उघड्यावर शौचास बसू नये. प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयांचा वापर करावा.

३) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.

**४) पत्रावळी व द्रोणचा वापर :** जेवणाकरिता थर्माकोल, प्लास्टिकच्या पत्रावळी वापरू नये. त्याऐवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा, द्रोणचा वापर करावा व प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा, पर्यावरणाचा समतोल साधावा.

**५) कचरा व्यवस्थापन :** आपल्या मठ / संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा. हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकू नये.

६) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पाणी प्यावे.

७) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.

८) धोकादायक इमारतींमध्ये राहू नये.

**९) पार्किंग व्यवस्था ठिकाणे :** अंबाबाई पटांगण, संत गजानन महाराज मठामागे, इसबावी विसावा मंदिर समोर, सांगोला रोड एम.एस.ई.बी. समोर, कुंभार घाट समोर कवठेकर गल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मरिआई पटांगण, कराड रोड वेअर हाऊस जवळ, रेल्वे स्टेशन मैदान, अहिल्यादेवी चौक नवीन पुलाजवळ, वाखरी पालखी तळ, कुर्डुवाडी रोड गणेश ढाबा पिछाडी इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१०) रस्त्यावर अतिक्रमण करून रहदारीस अडथळा निर्माण करू नये.

**वरील सूचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

**सचिन इथापे**
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

**डॉ.प्रशांत जाधव**
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर